शिक्षक पात्रता परिक्षा (TET) आयोजनासाठी
जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीची स्थापना

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०१३/प्र.क्र.९९/आरटीई**
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
तारीख: १४ नोव्हेंबर, २०१३

वाचा —

1) **शासन निर्णय क्रमांकः आरटीई २०१०/प्र.क्र.५७२/प्राशि-१, दिनांक १३/०२/२०१३**
2) **शासन निर्णय क्रमांकः आरटीई २०१३/प्र.क्र.९१/प्राशि-१, दिनांक २३/०८/२०१३**

प्रस्तावना —

राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना गुणात्मक व दर्जेदार शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची असल्याने महाराष्ट्र शासनाने सर्वत्र प्राथमिक व माध्यमिक शाळा उपलब्ध करुन दिल्या आहेत. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनामार्फत सध्या सुमारे १ लाख प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरु असून त्यात सुमारे १.८० कोटी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या १ लाख शाळांपैकी सुमारे ३२५७३ शाळा खाजगी आहेत. (अनुदानित २०,४५५, विना अनुदानित १२,०१८)

२. **६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण** (इ.१ ली ते ८ वी) याचा मूलभूत अधिकार केंद्र शासनाने केला आहे. त्या अनुषंगाने **"बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९"** पारित झाला असून त्याची अंमलबजावणी दिनांक १ एप्रिल, २०१० पासून राज्यात सुरु झाली आहे. या अधिनियमातील तरतूदीची अंमलबजावणी करण्यासाठी राज्याने **"महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११"** नियम अधिसूचीत केले आहेत.

३. **अधिनियम, २००९** च्या कलम-३ नुसार केंद्र शासनाने शिक्षक पदावर नियुक्तीसाठी पात्रता व सेवा शर्ती ठरविण्याकरिता **"राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE)** यांना "शैक्षणिक प्राधिकरण" म्हणून घोषित केले आहे. **"राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE)** यांनी दिनांक २३ ऑगस्ट, २०१० व दिनांक

२९ जुलै, २०११ च्या अधिसूचनेद्वारे प्राथमिक शिक्षकांकरिता (इ. १ ली ते ८ वी) किमान शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता निश्चित केली असून **"शिक्षक पात्रता परीक्षा" (Teachers Eligibility Test) TET** अनिवार्य केली आहे.

राज्य शासनाने शासन निर्णय दिनांक १३/०२/२०१३ द्वारे राज्यामध्ये प्राथमिक शिक्षकांकरिता (इ. १ ली ते ८ वी) शिक्षकांची किमान व्यावसायिक अर्हता निश्चित करताना "शिक्षक पात्रता परीक्षा" **TET** (Teachers Eligibility Test) अनिवार्य केली आहे.

४. "शिक्षक पात्रता परीक्षा" (Teachers Eligibility Test) ही प्राथमिक शिक्षण (इ. १ ली ते ८ वी) देणा-या सर्व शाळांमध्ये (सर्व व्यवस्थापन, सर्व माध्यम, सर्व परिक्षा मंडळे, अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित इ.) नव्याने नियुक्त होणाऱ्या सर्व शिक्षकांना लागू आहे. या परिक्षेचे आयोजन दरवर्षी आवश्यकतेप्रमाणे (किमान एकदा) शासनामार्फत होणार आहे. शिक्षकांसाठी किमान शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेबरोबर शिक्षक पात्रता परीक्षा (Teachers Eligibility Test) उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. शिक्षक पात्रता परीक्षा (Teachers Eligibility Test) उत्तीर्ण होणा-या उमेदवाराला थेटपणे नोकरी मिळणार नाही किंवा नोकरीसाठी त्यांचा कोणताही हक्क राहणार नाही.

५. "शिक्षक पात्रता परीक्षा" (Teachers Eligibility Test) शासनातर्फे किंवा शासनाने नियुक्त केलेल्या प्राधिकरण/संस्थाद्वारे घेण्यात येणार आहे. सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता "शिक्षक पात्रता परीक्षा"(Teachers Eligibility Test) आयोजन करण्याची सर्व जबाबदारी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यावर दिनांक २३ ऑगस्ट, २०१३ च्या शासन निर्णयान्वये सोपविण्यात आली आहे. त्यानुसार दिनांक १५ डिसेंबर, २०१३ रोजी राज्याच्या पहिल्या शिक्षक पात्रता परिक्षेचे आयोजन होत आहे. या परिक्षेसाठी जवळपास चार ते पाच लाख उमेदवार बसणार असल्याने, त्यासाठी जिल्हा स्तरावर योग्य संनियंत्रण व सर्व यंत्रणांकडून सहकार्य आवश्यक आहे. यास्तव **शिक्षक पात्रता परिक्षा सुरळीतपणे होण्यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हा परिक्षा आयोजन व संनियंत्रण समिती गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. त्यामुळे शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.**

## शासन निर्णय—

शिक्षक पात्रता परिक्षेचे आयोजनासाठी जिल्हा स्तरावर जिल्हा परिक्षा आयोजन व संनियंत्रण समिती खालीलप्रमाणे गठीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

| अ.क्र. | प्रवर्ग | पदनाम |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष |
| ३ | पोलीस आयुक्त/ जिल्हा पोलीस अधीक्षक यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | महानगरपालिका अस्तित्वात आहेत तेथे वरील समितीमध्ये संबंधित महानगरपालिकेच्या शिक्षण विषयक कार्यभार सांभाळणारे उपायुक्त, स्वतंत्र उपायुक्त नसल्यास प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ | सदस्य |
| ५ | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद | सदस्य |
| ६ | शिक्षणाधिकारी (निरंतर) | सदस्य |
| ७ | प्राचार्य जिल्हा प्रशिक्षण व संशोधन संस्था (डायट) | सदस्य |
| ८ | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद | सदस्य सचिव |

२. या समितीने खालीलप्रमाणे परिक्षा आयोजनासाठी सहकार्य करावे.

१. परिक्षेसाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्यात यावा.

२. परिक्षेसाठी जिल्हयातील अधिकारी व कर्मचारी वर्ग उपलब्ध करून द्यावा.

३. परिक्षा आयोजनासाठी जिल्हा स्तरावरील आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात यावा.

३. जिल्हा स्तरावरील परिक्षा आयोजनासाठी जिल्हा परिक्षा आयोजन व संनियंत्रण समिती यांचेकडून सहकार्य व संनियंत्रण होणार असले तरी आवश्यक खर्च महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेने करावयाचा आहे. परिषदेने त्यासाठी आवश्यक निधी जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना वर्ग करावा.

४. जिल्हा परिक्षा आयोजन व संनियंत्रण समिती यांची रचना व कार्य यापुढील सर्व शिक्षक पात्रता परिक्षांसाठी लागू राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१११४१३०२५३१२२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nana Uttamrao Raurale

Digitally signed by Nana Uttamrao Raurale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Nana Uttamrao Raurale
Date: 2013.11.14 13:06:29 +05'30'

( ना.उ.रौराळे )

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

२. मा. मंत्री (शालेय शिक्षण),

३. मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण),

४. मा. मंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व),

५. मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व),

६. मा. मुख्य सचिव याचे स्वीय सहायक,

७. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

८. सर्व प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई,

९. सर्व विभागीय आयुक्त,

१०.संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई

११.सर्व जिल्हाधिकारी,

१२.सर्व आयुक्त, महानगरपालिका,

१३.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

१४.राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई,

१५.शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,

१६.शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,

१७.शिक्षण संचालक(प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,

१८. संचालक, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे,

१९.संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे,

२०.संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ(बालभारती), पुणे,

२१.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

२२.सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,

२३.सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/प्रौढ), जिल्हा परिषद,

२४.सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/ नगर परिषद,

२५.आरटीई कक्ष